01 MAR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोखले इन्स्टिट्यूटसमवेत विद्यापीठाचा सामंजस्य करार



कोल्हापूर : पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटसमवेत सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि अधिष्ठाता डॉ. प्रशांत बनसोडे यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सागर डेळेकर, जगन कराडे, प्रतिमा पवार, प्रतिभा देसाई, प्रल्हाद माने, पूजा पाटील, कोमल ओसवाल, आकाश ब्राह्मणे.

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : पुणे येथील नामांकित गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा बुधवारी सामंजस्य करार झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, गोखले इन्स्टिट्यूटचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत बनसोडे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'धोरणनिश्चितीच्या कार्यात सहभागाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील संशोधक, अभ्यासकांना माहिती होण्याच्या दृष्टीने गोखले इन्स्टिट्यूटसमवेत होणारा सामंजस्य करार उपयुक्त ठरेल. ज्ञानाचा वापर समाजासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने कसा करावा, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर धोरणकर्त्यांना मार्गदर्शन कसे करावे, याचा वस्तुपाठ या संस्थेने घालून दिला आहे. समाजासाठी उत्तम काम करण्याची संधी संशोधकांना मिळणार आहे.'

डॉ. बनसोडे म्हणाले, 'गोखले इन्स्टिट्यूटने सुरुवातीपासूनच अनेक सामाजिक-आर्थिक महत्त्वाच्या विषयांवर संशोधन केले आहे. दोन्ही संस्थांना संयुक्तरित्या संशोधन समस्येची निवड करून त्यावर काम करता येईल.'

सामंजस्य करारावर डॉ. बनसोडे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. सागर डेळेकर, प्रतिभा देसाई, प्रल्हाद माने, पूजा पाटील, कोमल ओसवाल, आकाश ब्राह्मणे उपस्थित होते. कराराचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले.

**विद्यार्थ्यांना करता येईल इंटर्नशीप**

डॉ. बनसोडे म्हणाले, 'शासनाच्या महाउन्नत अभियानाच्या अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना संस्थेत इंटर्नशीपही करता येईल. संस्थेच्या संशोधन पद्धतीशास्त्रावरील सहा महिन्यांच्या अभ्यासक्रमासारखे विविध अभ्यासक्रमही करता येतील.'

01 MAR 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा गोखले इन्स्टिट्यूटसमवेत सामंजस्य करार

## धोरण निश्चिती कार्यात सहभागासाठी उद्युक्त करणारा करार : कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

धोरण निश्चितीच्या कार्यात सहभागाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील संशोधक, अभ्यासकांना माहिती होण्याच्या दृष्टीने गोखले इन्स्टिट्यूटसमवेत होणारा सामंजस्य करार उपयुक्त ठरेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी व्यक्त केला.



**कोल्हापूर : पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटमवेत सामंजस्य करार प्रसंगी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. प्रशांत बनसोडे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. सागर डेळेकर आदी.**

पुणे येथील नामांकित गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला. यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, गोखले इन्स्टिट्यूटचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत बनसोडे उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, गोखले इन्स्टिट्यूसमवेत होणारा करार विद्यापीठाच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा आहे. शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना संस्थेकडून मार्गदर्शन मिळेल. संस्थेचे ग्रंथालय अनेक महत्त्वाच्या अहवालांनी समृद्ध आहे, त्या अहवालांचा अभ्यास करून संयुक्त संशोधन प्रकल्पही हाती घेता येऊ शकतील.

डॉ. बनसोडे म्हणाले, विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थानिक विद्यापीठांशी सहकार्य करून त्या माध्यमातून स्थानिक समस्यांचे विश्लेषण करून त्यांच्या निराकरणाचे उपाय सुचविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाशी होणारा करार महत्त्वाचा आहे. संस्थेच्या संशोधन पद्धतीशास्त्रावरील सहा महिन्यांच्या अभ्यासक्रमासारखे विविध अभ्यासक्रमही करता येतील. करारावर गोखले इन्स्टिट्यूटतर्फे डॉ. बनसोडे यांनी व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केली. समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. पूजा पाटील, कोमल ओसवाल, आकाश ब्राह्मणे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024
लोकमत

# विद्यापीठाचा गोखले इन्स्टिट्यूटसमवेत करार

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : धोरणनिश्चितीच्या कार्यात सहभागाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील संशोधक, अभ्यासकांना माहिती होण्याच्या दृष्टीने गोखले इन्स्टिट्यूटसमवेतचा सामंजस्य करार उपयुक्त ठरेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला.

पुणे येथील नामांकित गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा बुधवारी सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, गोखले इन्स्टिट्यूटचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत बनसोडे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, गोखले इन्स्टिट्यूसमवेत होणारा हा करार विद्यापीठाच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा आहे. संस्थेचे ग्रंथालयही अनेक महत्त्वाच्या अहवालांनी समृद्ध आहे, त्या अहवालांचा अभ्यास करून अनुषंगिक संयुक्त संशोधन प्रकल्पही हाती घेता येऊ शकतील. डॉ. प्रशांत बनसोडे म्हणाले, विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थानिक विद्यापीठांशी सहकार्य करून त्या माध्यमातून स्थानिक समस्यांचे विश्लेषण करून त्यांच्या निराकरणाचे उपाय सुचविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाशी होणारा करार महत्त्वाचा आहे. दोन्ही संस्थांना संयुक्तरीत्या संशोधन समस्येची निवड करून त्यावर काम करता येईल.

या करारावर गोखले इन्स्टिट्यूटच्या वतीने डॉ. बनसोडे यांनी तर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. पूजा पाटील, कोमल ओसवाल, आकाश ब्राह्मणे उपस्थित होते.

01 MAR 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आता ' मोत्यांची शेती '

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अभिनव आणि नवोन्मेषी उपक्रमांना सातत्याने पाठबळ देणारे शिवाजी विद्यापीठ आता खऱ्याखुऱ्या मोत्यांची शेती पिकविण्यास सिद्ध झाले आहे. विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या पुढाकारातून 'गोड्या पाण्यातील मोती संवर्धन, संशोधन आणि उत्पादन केंद्रा'चे बुधवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात उद्घाटन झाले.



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या मोती उत्पादन, संशोधन केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासमवेत डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. नितीन कांबळे, दिलीप कांबळे आदी.**

कुलगुरू डॉ. शिर्के यांना सडोली दुमाला येथील मोती उत्पादक व प्रशिक्षक दिलीप कांबळे यांच्याविषयी माहिती समजल्यानंतर त्यांनी प्राणीशास्त्र अधिविभागाला त्यांच्याशी संपर्क साधून अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी उभारण्याविषयी चाचपणी करण्याची सूचना केली होती. त्यानुसार आज विद्यापीठात हे मोती पिकविणारे केंद्र कांबळे यांच्याच सहकार्यातून उभे राहिले आहे. विभागातील प्राणीशास्त्रज्ञ डॉ. नितीन कांबळे हे त्याचे समन्वयक म्हणून काम पाहात आहेत.

प्राणीशास्त्र अधिविभागाच्या सकारात्मक प्रतिसादातून हे केंद्र उभे राहिले, त्याबद्दल उद्घाटन प्रसंगी विभागाचे अभिनंदन करून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आज कार्यान्वित करण्यात आलेल्या गोड्या पाण्यातील मोत्यांच्या उत्पादन व संशोधनाचे केंद्र हेही या मालिकेतील महत्त्वाचे पाऊल आहे. ही मोत्यांची शेती विद्यापीठ पैशांसाठी करीत नसून ज्ञानसंवर्धनासाठी करीत आहे. यावेळी डॉ. नितीन कांबळे आणि दिलीप कांबळे यांनी कुलगुरूंसह उपस्थितांना मोत्यांचे फार्मिंग कशा प्रकारे करण्यात येते, याचे सविस्तर प्रात्यक्षिक करून दाखविले. याप्रसंगी अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. एस. आर. यन्कंची, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. सुनील गायकवाड यांच्यासह प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024
पुढारी

# राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराजांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ एमबीए युनिट, वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागामार्फत राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी एमबीए विभागाचे प्र-संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दीपा इंगवले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात संत गाडगे महाराज जयंती साजरी

**कोल्हापूर :** एमबीए युनिट, वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभाग यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठातील मुख्य इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त तयांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. एमबीए विभागाचे प्र- संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दीपा इंगवले आदी उपस्थित होते.

01 MAR 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतकऱ्यांनी आळिंबीद्वारे उत्पन्न वाढवावे

## कुलगुरू : विद्यापीठात धिंगरी आळिंबी लागवड प्रशिक्षणास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्थानिक शेतकऱ्यांनी अळिंबी उत्पादनाद्वारे त्यांचे उत्पन्न वाढवावे. विद्यार्थ्यांनी याकडे व्यावसायिक संधी म्हणून पाहावे, यासाठी शिवाजी विद्यापीठात आळिंबी लागवड प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभाग, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्र व अखिल भारतीय समन्वित आळिंबी संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय 'धिंगरी आळिंबी लागवड व प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रम' उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, विकसित भारत संकल्पनेच्या सर्वांगीण यशस्वितेसाठी असे वैविध्यपूर्ण उपक्रम अपेक्षित आहेत. आळिंबी उत्पादनाच्या क्षेत्रातील आव्हाने, संधी, बाजारपेठांची उपलब्धता अशा चौफेर बाबींची माहिती प्रशिक्षणार्थींनी तज्ज्ञांकडून जाणून घ्यावी.

पुणे कृषी महाविद्यालयाचे कवकशास्त्रज्ञ व प्रशिक्षक डॉ. अशोक जाधव यांनी मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रवीणकुमार पाटील, डॉ. अविनाश भाले, डॉ. राजेंद्र सोनकवडे, नामदेव देसाई, डॉ. हेमराज यादव, चेतन भोसले आदी उपस्थित होते. डॉ. सागर डेळेकर, डॉ. अभिजीत गाताडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.

01 MAR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकासात आदिवासींचा सहभाग वाढावा

## प्रा. मिंझ : सामाजिक वंचितता अभ्यास केंद्रातर्फे परिषद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : आदिवासींच्या विकासातील सहभाग वाढला, तर समावेशनास उपयुक्त ठरेल. स्वाभिमानाने जगता आले तरच समावेशन सार्थक होते. त्यासाठी प्रभावी शिक्षण आवश्यक आहे. अमृतकाळ हा आदिवासींसाठी जीवनदायी ठरवा, अशा धोरणांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन जेएनयूच्या प्राध्यापक डॉ. सोनाझारिया मिंझ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे आयोजित 'अमृतकाळ आणि भारतातील आदिवासींचे समावेशन' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बीजभाषक म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'अमृतकाळात आदिवासी समुदायाला विकासाची संधी मिळवून देणे ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी मार्गदर्शन केले. अनिल वर्गीस, विजय माने, संपत देसाई, प्रकाश पवार, संतोष पावरा, अमोल मिणचेकर, आकाश ब्राह्मणे, किशोर खिलारे, शरद पाटील, पी. एन. देवळी, चारुशिला तासगावे, सुशांत पंडित, भारत रावण, साहिल मेहता, विक्रम कांबळे उपस्थित होते. केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश भाले यांनी आभार मानले.

01 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'भारत-पाकिस्तान संबंधांवर' आजपासून व्याख्यानमाला



कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे उद्या, शुक्रवारी आणि शनिवारी (ता. २ मार्च) विशेष व्याख्यानमालेचे मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजन केले आहे. 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावरील व्याख्यानमालेमध्ये नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात हे व्याख्याते म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. व्याख्यामालेचा प्रारंभ शुक्रवारी सकाळी अकरा वाजता होणार असल्याची माहिती राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024
पुढारी

# भारत-पाकिस्तान संबंधावर आजपासून व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामार्फत एक व दोन मार्च रोजी सकाळी ११ वा. दोनदिवसीय विशेष व्याख्यानमालेचे मानव्यशास्त्र सभागृहात आयोजन केले आहे. 'भारत-पाकिस्तान संबंध' विषयावरील व्याख्यानमालेस नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. व्याख्यानमालेचा लाभ घेण्याचे आवाहन राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024
तरूण भारत

# विद्यापीठात भारत-पाकिस्तान संबंधावर आज व्याख्यान



**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामार्फत आज (दि. १) सकाळी ११ वाजता 'भारत-पाकिस्तान संबंध' विषयावर व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे.

ही व्याख्यानमाला मानव्यशास्त्र सभागृहात होणार असून नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या व्याख्यानमालेचा समारोप शनिवार २ मार्च रोजी होणार आहे.

तरी जास्तीत जास्त विद्यार्थी, प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

लोकमत

# व्याख्यानमाला आजपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामार्फत आज शुक्रवार व उद्या शनिवारी सकाळी ११ वाजता नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांच्या 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावर दोनदिवसीय विशेष व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के असतील. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

सकाळ

# विद्यापीठात राष्ट्रीय योग, निसर्गोपचार परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषद झाली. जालन्याचे निसर्गोपचार तज्ज्ञ नारायण अंभोरे, विभागप्रमुख आर. जी. पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगता झाली. आचार्य हेमंत खेडेकर, अशोक कशाळकर, डॉ. शरदचंद्र भालेकर, किरण सारडा, रवींद्र खैरे यांची विविध विषयांवर व्याख्याने झाली. योगशास्त्रातील शुद्धिक्रिया वीणा मालडीकर आणि एम. ए. योगशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी सादर केल्या. निसर्गोपचाराची प्रात्यक्षिके डॉ. श्वेतलिना पाटील, अरविंद पालके यांनी सादर केली. विविध शोधनिबंधांचे सादरीकरण संशोधकांनी केले. यशोधन बोकील, आर. एम. जाधव, प्रमोद कांबळे, प्रीती चव्हाण, नीलम मोरे, उदय घाटे, वसंत सिंघन, सुधाकर भोसले, बाळासाहेब पाटील उपस्थित होते. कानिफनाथ पंढरे यांनी प्रास्ताविक केले. टी. आर. गुरव, क्षितीजा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. आसावरी कागवाडे यांनी आभार मानले. श्वेता आठवले यांच्या योग पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024

तरुण भारत

# प्रेरणा, ज्ञान कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाच्यावतीने इन्स्पिरेशन अँड नॉलेज स्ट्रेन्दनिंग या विषयावर प्रेरणा व ज्ञान सुदृढीकरण कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेत कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यांतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे उद्घाटन प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख व संयोजक डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. नितीन कांबळे व डॉ. अण्णा गोफणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्राणीशास्त्र विषयातील संधी, विभागातील सुविधा व योजनांची माहिती देण्यात आली.

कार्यशाळेअंतर्गत विभागात सुरू असलेल्या संशोधनाविषयीचे विशेष प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रदर्शनामध्ये रेशीम उद्योग, कीटकांचे जीवनचक्र व त्यांची विविधता, प्राणीसंग्रहालय, शरीरशास्त्रातील विविध उपकरणे, फुलपाखरू उद्यान, प्राणी संगोपन कक्ष, जेल इलेक्ट्रोफोरेसिस, विविध सूक्ष्मदर्शक, स्पेक्ट्रोमीटर, लॅमिनार एअर फ्लो आदींचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा परिसर, जलसंवर्धनाचे प्रयोग, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, एकात्मिक सुविधा केंद्र आदी ठिकाणी भेटी दिल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024

पुण्यनगरी



कार्यशाळेत मागदर्शन करताना डॉ. अनिल गोरे, सोबत अन्य मान्यवर.

# संख्याशास्त्रीय शिक्षणातून समाजसेवा : डॉ. गोरे

**कोल्हापूर :** न्यू कॉलेज, संख्याशास्त्र विभाग यांच्यामार्फत 'वास्तविक जीवनातील आकडेवारी ' या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा आयोजित केली होती. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संख्याशास्त्रीय सल्लागाराची भूमिका करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे हा या कार्यशाळेचा प्रमुख हेतू आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या संख्याशास्त्र आधिविभागाचे सेवानिवृत्त प्रा.डॉ. अनिल गोरे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील होते. तर पुण्याच्या मॅट्रीक कन्सल्टन्सीचे संस्थानक अध्यक्ष डॉ. आनंद करंदीकर, शिवाजी विद्यापीठाचे संख्याशास्त्र अधिविभागचे प्रमुख डॉ. शशीभूषण महडिक यांची प्रमुख उपस्थिती होती. न्यू कॉलेजचे विभागाप्रमुख डॉ. आण्णासोहब कलगोंडा यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दादासाहेब गोडसे यांनी आभार मानले.

सकाळ

# संख्याशास्त्र विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी प्रकल्प घ्यावेत : डॉ. गोरे

कोल्हापूर, ता. २९ : संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी प्रकल्प शिक्षणासाठी घ्यावेत, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अनिल गोरे यांनी आज येथे केले. येथील न्यू कॉलेजमधील संख्याशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. 'वास्तविक जीवनातील आकडेवारी' याविषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, तर पुण्याच्या मॅट्रिक कन्सल्टन्सीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आनंद करंदीकर, डॉ. शशिभूषण महाडिक प्रमुख उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024

महासत्ता

# मतदार साक्षरता मोहिमेत विद्यापीठाने भरीव योगदान द्यावे -देशपांडे

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी निवडणूक प्रक्रियेत युवकांचा सहभाग महत्वपूर्ण असून मतदार साक्षरता मोहिमेच्या कामाची दखल भारत निवडणूक आयोगाने घ्यावी, असे भरीव योगदान शिवाजी विद्यापीठाने द्यावे, असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात श्री. देशपांडे यांनी विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी संवाद साधला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी समाधान शेंडगे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. यावेळी मतदार नोंदणीत उत्कृष्ट काम करणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभागातर्फे आयोजित कार्यशाळेमध्ये बोलताना ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर. सोबत प्राचार्य डॉ. विलास पोवार, डॉ. इस्माईल पठाण, डॉ. अवनिश पाटील.

# शिवरायांचा धर्मविषयक विचार सर्वसमावेशक : डॉ. हिर्डेकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज उदारमतवादी राजे होते. त्यांचा धर्मविषयक विचार समावेशक होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग व छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवरायांची धर्मनीती' विषयावर कार्यशाळेमध्ये ते बोलत होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, शिवाजी महाराज यांनी स्वधर्म रक्षणाबरोबरच इतर धर्मीयांविषयी त्यांचे धोरण सहिष्णू होते. स्वराज्य स्थापनेमध्ये सर्व जाती-धर्माच्या लोकांना त्यांच्या

- विद्यापीठातील इतिहास विभागातर्फे कार्यशाळा

कर्तबगारीनुसार मोठी पदे दिली. शिवाजी महाराजांचा धर्मविषयक विचार समजून घेण्यासाठी डॉ. इस्माईल पठाण यांचा 'शिवरायांची धर्मनीती' हा ग्रंथ उपयुक्त आहे. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. विलास पोवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी शेतकरी, स्त्रिया, सर्वसामान्य लोक यांच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांचे धर्मविषयक धोरण हे सर्वव्यापी असे होते. डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024
सकाळ

# शिवरायांचा धर्मविषयक विचार सर्वसमावेशक

## डॉ. बी. एम. हिर्डेकर; विद्यापीठात कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : छत्रपती शिवरायांचा धर्मविषयक विचार सर्वसमावेशक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे माजी नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्रातर्फे प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण लिखित 'शिवरायांची धर्मनीती' या ग्रंथावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास पोवार होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, 'छत्रपती शिवरायांचे धर्मविषयक विचार समजून घेण्यासाठी डॉ. पठाण यांचे पुस्तक अतिशय उपयुक्त आहे. तरुण पिढीने त्याचे निश्चितपणे वाचन करावे.'

डॉ. पठाण म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज यांनी तर कर्तबगारीच्या जोरावर अनेक सामान्य लोकांना महत्त्वाची पदे दिली.'

छत्रपती शिवाजी महाराज यांनी शेतकरी, स्त्रिया, सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांचे धर्मविषयक धोरण हे सर्वव्यापी होते. त्यासाठी डॉ. पठाण यांचा ग्रंथ अतिशय उपयुक्त असल्याचे डॉ. पोवार यांनी सांगितले. इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

पुढारी

# नॅनो सायन्स अधिविभागाच्या वैज्ञानिक प्रदर्शन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधत ओपन डे इव्हेंट अंतर्गत वैज्ञानिक प्रदर्शनात पोस्टर व मॉडेल सादरीकरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन मुंबई येथील भाभा अनुसंशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. प्रभात सिंग, डॉ. अपूर्व गुलेरिया व अधिविभागाचे संचालक प्रा. के. के. शर्मा, ओपन डे इव्हेंटचे समन्वयक डॉ. के. व्ही. खोत यांच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेसाठी जिल्ह्यातील हायस्कूल व कॉलेजच्या १५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी स्पर्धेस व नॅनो सायन्स अधिविभागाच्या विविध संशोधन प्रयोगशाळांना भेट दिली. स्पर्धा प्रकारांमधून दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांना पारितोषके देऊन गौरविले. आमंत्रित शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांना संशोधनातील नॅनो सायन्सचे महत्त्व व्याख्यानाद्वारे सांगितले.

सकाळ

# 'नॅनोसायन्स'मध्ये वैज्ञानिक प्रदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागामध्ये राष्ट्रीय विज्ञानदिनानिमित्त वैज्ञानिक प्रदर्शनात पोस्टर व मॉडेल सादरीकरण स्पर्धा झाली. स्कूल ऑफ नॅनोसायन्स आणि भाभा अनुसंशोधन केंद्र मुंबई यांच्यामधील सामंजस्य कराराअंतर्गत स्पर्धा घेण्यात आली. इयत्ता नववी ते बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचा एक गट, तर विज्ञान शाखेतील पदवीच्या विद्यार्थ्यांचा दुसरा गटात स्पर्धा झाली. उद्घाटन भाभा अनुसंशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. प्रभात सिंग, अपूर्व गुलेरिया, अधिविभागाचे संचालक प्रा. के. के. शर्मा, ओपन डे इव्हेंटचे समन्वयक डॉ. के. व्ही. खोत यांच्या उपस्थितीमध्ये झाले. विद्यार्थ्यांनी पदार्थ विज्ञान, नॅनोसायन्स, उर्जा निर्मिती, हायड्रोजन गॅस निर्मिती, इलेक्टॉनिक स्मार्ट सेन्सर्स, अतिसुक्ष्म पेशीय उपकरणे, जलशुद्धीकरणाचे नॅनोतंत्रज्ञान याविषयावरील पोस्टर्स, मॉडेल्सचे सादरीकरण केले. त्यातील बारा विद्यार्थ्यांना गौरविले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातातील राष्ट्रीय योग, निसर्गोपचार परिषदेत प्रात्यक्षिके सादर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ व आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषदेत योगशास्त्रातील शुद्धिक्रिया विद्यार्थ्यांनी सादर केल्या. निसर्गोपचाराची प्रात्यक्षिके डॉ. श्वेतलीना पाटील, अरविंद पालके यांच्यासह तज्ज्ञांनी सादर केली.

राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषदेचा समारोप जालन्याचे निसर्गोपचारतज्ज्ञ नारायण अंभोरे यांच्या उपस्थितीत व विभागप्रमुख आर. जी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यंदा 'योग व निसर्गोपचाराचे नवे आयाम' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. परिषदेत आचार्य हेमंत खेडेकर, अशोक कशाळकर, डॉ. शरदचंद्र भालेकर, नारायण अंभोरे, किरण सारडा, रवींद्र खैरे आदी मान्यवरांची व्याख्याने झाली. परिषदेत योग व निसर्गोपचार या विषयावरील विविध शोधनिबंधांचे सादरीकरण संशोधकांनी केले. परिषदेत १३० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला होता. कानिफनाथ पंढरे यांनी प्रास्ताविक केले. आसावरी कागवाडे यांनी आभार मानले. टी. आर. गुरव, क्षितिजा पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी यशोधन बोकील, आर. एम. जाधव, प्रमोद कांबळे, प्रीती चव्हाण, नीलम मोरे, सुधाकर भोसले, बाळासाहेब पाटील आदी उपस्थित होते.